# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर</u>

## रद्दी विक्रीची जाहिर निविदा

या जाहीर निविदेद्वारे तमाम रद्दी खरेदीदारांस कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील मध्यवर्ती अभिलेख विभागातील मुदतबाहय मोस्तर फाडून निघालेली रद्दी विक्री करावयाची आहे.

ज्या कोणी शासकीय रद्दी खरेदीदारांस याबाबत स्वारस्य असेल त्यांनी सदरहू रद्दी प्रत्यक्ष बघून रद्दी खरेदीचे भाव बंद लिफाप्यात मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर या नावाने पत्त्याच्या पाकीटावर **<u>रद्दी खरेदीचे दरपत्रक</u>** असा उल्लेख करुन प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचेकडे **दिनांक २३/०१/२०२४** पर्यंत अगर तत्पुर्वी कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन वेळेदिवशी **प्रत्यक्ष** आणून द्यावेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. रद्दी खरेदीचा भाव खालील शर्तीस अधीन राहून पुरवावेत.

### <u>शर्ती</u>

१. रद्दी प्रत्यक्ष बघून निविदा भरण्यांत याव्यात आणि प्रत्यक्ष पाहून रद्दीचे भाव बंद लिफाप्यात कळविताना प्रती किलोचे दर अंकात व अक्षरात दोन्ही प्रकारे नमूद करावेत.

२. ज्यांची निविदा मंजूर करण्यात आलेली आहे त्यांना या कार्यालया मार्फत लेखी कळविण्यात येईल.

३. वजन करणेकरीता वापरण्यात येणारा इलेक्ट्रॉनिक किंवा इतर कोणताही वजनकाटा सहाय्यक निरिक्षक, वैधमापन शाखा कोल्हापूर यांचेकडून रद्दी विक्रीचे दिवशी या कार्यालयामार्फत तपासण्यात येईल.

४. रद्दी करीता आवश्यक असलेली पोती, कामगार वर्ग व वाहतूक खर्च निविदाधारकाने करावयाचा आहे.

५. रद्दी उचलण्याचे आदेश दिल्यानंतर त्वरीत संबधित मक्तेदारास स्वखर्चाने या कार्यालयातून रद्दी उचलून न्यावी लागेल. विलंब झाल्यास त्यापासून होणा-या नुकसानीस संबंधित खरेदीदार जबाबदार राहील. त्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

६. सदरील रद्दी ही उचलल्यानंतर त्याच दिवशी रद्दीची संपुर्ण रक्कम वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांचेकडे जमा करावी लागेल.

७. मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर यांचेकडे रद्दीचे दरपत्रक स्विकारणे अगर नाकारणे याबाबतचे संपूर्ण अधिकार राखीव ठेवण्यात आलेले आहेत.

जा.क्र./अभिलेख/ २७५ /२०२४ {} प्रभारी प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर {} जिल्हा व सत्र न्यायालय,
दिनांकः- १०/०१/२०२४ {} कोल्हापूर

... २ ...

प्रत माहितीस्तव व नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्याकरिता सस्नेह अग्रेषित -

१. मा. दिवाणी न्यायाधीशसाो वरिष्ठ स्तर, कोल्हापूर

२. मा. जिल्हाधिकारीसो, जिल्हाधिकारी कार्यालय, नागाळा पार्क, कोल्हापूर

३. मा. तहसिलदारसो, तहसिल कार्यालय, करवीर, कोल्हापूर

10-1-24

जिल्हा न्यायालय, कोल्हापूर
दिनांक १०/०१/२०२४

प्रभारी प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
कोल्हापूर